**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
- महाराष्ट्र खासगी विद्यापीठे सुधारणा विधेयक २०२५ विधानपरिषदेत संमत
- तेलंगण सीमा भागातली वादग्रस्त १४ गावं लवकरच चंद्रपूर जिल्ह्यात समाविष्ट होणार
- 'केसरी'चे विश्वस्त संपादक आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**आणि**

- आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाच्या प्रो लीग स्पर्धेत भारताच्या दीपिकाला २०२४-२५ चा पॉलिग्रास मॅजिक स्किल पुरस्कार

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेच्या अंमलबजावणीला केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. पुढची ६ वर्षं देशातल्या १०० आकांक्षित जिल्ह्यांमधे ही योजना राबवली जाईल. कृषी उत्पादकता वाढवणं, पीक बदल आणि शाश्वत शेती पद्धतीचा प्रसार तसंच पंचायत आणि विकासखंड स्तरावर सिंचन सुविधांमधे वाढ, अल्प आणि दीर्घकालीन पतपुरवठा इत्यादी उद्दिष्टं या योजनेत निर्धारित केली आहेत.

अंतराळवीर ग्रुपकॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्या यशस्वी अंतराळ प्रवासाबद्दल त्यांचं अभिनंदन करणारा प्रस्ताव केंद्रीय मंत्रिमंडळाने आज मंजूर केला. भारताचं स्वतःचं अंतराळ स्थानक तयार करण्याच्या उद्दिष्टाकडे या मोहिमेमुळे पुढचं पाऊल पडलं असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. सूक्ष्म गुरुत्वाकर्षणासंबंधी स्नायूंचं

पुनरुज्जीवन, सूक्ष्म जीवांची वाढ, पिकांची शक्यता अशा विविध विषयातले प्रयोग शुक्ला यांनी अतराळ वास्तव्यात केले असून त्याचा भविष्यातल्या अंतराळ मोहिमांना उपयोग होईल, असं ते म्हणाले.

<><><><>

राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळाला महामंडळाच्या हरित उर्जा कंपनीत गुंतवणूक करण्याचे वाढीव अधिकार बहाल करण्याचा प्रस्ताव आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या अर्थविषयक व्यवहार समितीने मंजूर केला. त्यामुळे आता एनटीपीसीला नवीकरणीय ऊर्जा निर्मिती क्षमता २०३२ पर्यंत ६० गिगावॅट इतकी वाढवण्याच्या दृष्टीनं २० हजार कोटी रुपयेपर्यंत गुंतवणूक करता येईल. या निर्णयाकरता महारत्न आणि नवरत्न उद्योगांसाठीच्या मार्गदर्शक सूचनांमधेही आवश्यक बदल करायला मंजुरी मिळाली आहे.

<><><><>

संसदेच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी रविवारी केंद्रसरकारनं सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सर्व पक्षांकडून सहकार्याचं आवाहन या बैठकीत सरकार करेल. पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारी, २१ जुलैपासून सुरु होणार असून  ते येत्या २१ ऑगस्टपर्यंत चालेल.

अधिवेशनादरम्यान अनेक महत्त्वाचा विधेयकं चर्चेनंतर मंजूर होण्याची शक्यता आहे.

<><><><>

महाराष्ट्र खासगी विद्यापीठे (स्थापना - विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ आज विधानपरिषदेत मंजूर झालं.

शेजारी राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वीज दर कमी असून शेतकऱ्यांना सौर वीज घेण्याची सक्ती नाही मात्र, त्यांच्या सौर ऊर्जेशी संबंधित अडचणी समजून

घेऊन त्यावर प्राधान्यानं उपाय शोधले जात आहेत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानपरिषदेत सांगितलं.

विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा कार्यकाळ पुढच्या महिन्यात संपणार असल्यानं सभागृहानं आज त्यांना निरोप दिला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह विविध पक्षांच्या नेत्यांनी त्यांच्या भाषणात दानवे यांच्या कामाचं कौतुक केलं.

**<><><><><>**

मुंबईत उपनगरी रेल्वे गाडीतून प्रवास करताना गेल्या तीन वर्षांत साडेसात हजार पेक्षा जास्त जणांचा जीव गेला असून सुमारे ७ हजार३०० जण जखमी झाले असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानसभेत दिली. सरकारी कार्यालयांप्रमाणेच खासगी आस्थापनांच्या वेळेत बदल करून लोकलवरचा भार कमी कसा करता येईल, याचा अभ्यास करण्यासाठी टास्क फोर्स स्थापन करू, असं आश्वासन त्यांनी दिलं.

खासगी शिकवणी वर्गाशी संधान साधून महाविद्यालयं चालवण्याच्या प्रकाराला आळा घालण्यासाठी लवकरच कायदा करण्यात येईल अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री  दादा भुसे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

शाळांच्या फी व्यतिरिक्त अन्य बाबी दाखवून त्याखाली वसूल करण्यात येणाऱ्या अतिरिक्त फीवर आळा घालण्यासाठी लवकरच नियमात दुरुस्ती करण्यात येणार असल्याचं भुसे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

गेल्या अकरा वर्षांत वार्षिक अन्नधान्य उत्पादन ८ पूर्णांक १ दशलक्ष टनांपर्यंत,  तसंच फळे, भाज्या आणि दुधाचे वार्षिक उत्पादन अनुक्रमे ७ पूर्णांक ५ दशलक्ष टन आणि १० पूर्णांक २ दशलक्ष टनांपर्यंत वाढलं  आहे, असं  कृषी आणि

शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं ९७ व्या आयसीएआर स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**<><><><><>**

महाराष्ट्र-तेलंगणा सीमावादात अडकलेली जिवती तालुक्यातील १४ मराठी गावं लवकरच महाराष्ट्रात समाविष्ट होणार आहेत. ही १४ गावं चंद्रपूर जिल्ह्यात येणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत, यावर अंतिम निर्णय लवकरच घेतला जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिली. विधानभवनातल्या दालनात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.....

**होल्ड - बाईट- बावनकुळे**

**<><><><><>**

लोकमान्य टिळकांचे पणतू, 'केसरी'चे विश्वस्त संपादक आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक यांचं आज पहाटे पुण्यात निधन झालं, ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अनेक मान्यवरांनी यावेळी उपस्थित राहून त्यांना आदरांजली वाहिली.

दीपक टिळक यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

भारतीय महिला हॉकीपटू दीपिकाला आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाच्या प्रो लीग स्पर्धेमध्ये वर्ष २०२४-२५ चा पॉलिग्रास मॅजिक स्किल पुरस्कार मिळाला आहे. जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असणाऱ्या नेदरलँड्सविरुद्ध शानदार गोल करून तिने हा पुरस्कार मिळवला. पुरुषांच्या गटात, बेल्जियमच्या

व्हिक्टर वेग्नेझला हा पुरस्कार मिळाला, तर  या पुरस्कारासाठी महिला गटात स्पेनच्या पॅट्रिशिया अल्वारेझ ला ही नामांकन मिळालं होतं.

**<><><><>**

जपानच्या खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत आज भारताने चांगली सुरुवात केली. टोकियो इथे सुरु असलेल्या या स्पर्धेत पुरुष दुहेरी गटात भारताच्या सात्विकसाईराज रांकिरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी तर एकेरी गटात लक्ष्य सेन यांनी दमदार कामगिरी करत दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळवला. सात्विक साईराज आणि चिराग या जोडीनं दक्षिण कोरियाच्या कांग मिन हुक आणि किम डाँग यांचा पराभव करत शुभारंभाच्या सामन्यात जागतिक पातळीवरचं १५ वं स्थान पटकावलं. लक्ष्य सेन याने देखील चीनच्या वांग झेन्ग झिंग याचा पराभव केला. मात्र, दोन वेळा ऑलिम्पिक पदक मिळवलेल्या पीव्ही सिंधू हिला पराभवाला सामोरं जावं लागलं.

**<><><><>**

वाढवण बंदराच्या उभारणीमुळे महाराष्ट्र आणि भारत,  सागरी महासत्ता होण्याच्या दिशेनं  वेगानं  वाटचाल करत असून, हा प्रकल्प केवळ बंदर नव्हे तर एक आर्थिक क्रांती घडवून आणणारा केंद्रबिंदू ठरेल, असं  प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. राज्य शासनाच्या मत्स्य व्यवसाय, बंदरे विभाग, आणि महाराष्ट्र सागरी मंडळाच्या वतीनं आयोजित ‘सागरी शिखर परिषद २०२५’ चं उद्घाटन करताना ते बोलत होते. भविष्यात भारत हा जागतिक सप्लाय चेनमधला महत्वाचा भागीदार बनू शकतो, असं ते म्हणाले.

**<><><><>**

येत्या दोन दिवसात देशाच्या पूर्व, मध्य आणि दक्षिणेकडच्या काही भागात जोरदार ते अतिजोरदार पर्जन्यवृष्टी होईल, असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त

केला आहे. जम्मू कश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, पंजाब तसंच हरियाणा इथे येत्या २२ तारखेपर्यंत मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**